वाचले:- १) महा.जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ चे नियम ६(८)

२) म.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.जळगांव यांचेकडील प्रस्ताव क्रमांक जाक्र.आरोग्य/आस्था-५अ/आरआर/६४/२०१४ दि. ३१/०१/२०१४.

३) शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक जिपब/७०६/प्र.क्र.५०/अस्था१४/दि. २० मार्च २००७

४) शासन शुध्दीपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग जिपब/७०६/प्र.क्र.५०/अस्था१४,दिनांक १ जुन०७

५) शासन परिपत्रक ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्रमांक जिपब/७११/प्र.क्र.११३/११ अस्था१४ दि.२९/९/२०११

६) म.मुख्य कार्यकारी अधिकारी, यांची मंजुर टिपणी दिनांक- १८/११/२०१५.

---

**आदेश**

नाशिक जिल्हा परिषद नाशिक
आरोग्य विभाग
जा.क्र.जिपना/आरोग्य/अस्था-१/९५३/२०१५.
नाशिक दिनांक- १८ / ११ /२०१५.

ज्याअर्थी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ मधील नियम ६ (८) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन सातारा जिल्हा परिषदेतील **श्रीम. सुनिता नानाजी जोपळे, आरोग्य सेविका (महिला) प्राथमिक आरोग्य केंद्र.गुढे,उपकेंद्र.जुवाडी, ता. भडगांव, जि. जळगांव** यांना एकतर्फी आंतर जिल्हा बदलीने नाशिक जिल्हा परिषदेत महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) नियम १९६७ परिशिष्ट ५ (६) मधील तरतुदीनुसार जिल्हा सेवा वर्ग-३ आरोग्य सेविका (महिला) तृतीय श्रेणी (५२००-२०२००) ग्रेड पे २४००/- या वेतन श्रेणीत खालीलप्रमाणे नमुद केलेल्या ठिकाणी पदस्थापना खाली नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहुन नाशिक जिल्हा परिषदेमध्ये सामावुन घेण्यांचा आदेश देत आहेत.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | हुद्दा | जातीचा प्रवर्ग | नाशिक जिल्हा परिषदेमध्ये ज्या प्रवर्गात सामावुन घेण्यात आलेला प्रवर्ग | अनुसूचित क्षेत्रात पदस्थापना दि॰॰े कार्यालय | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | प्रा.आ.केंद्र | उपकेंद्र | ता॰॰का |
| १) | श्रीम.सुनिता नानाजी जोपळे | आरोग्य सेविका (महिला) | अनु. जमाती | अनु. जमाती (S.T) | खेड | | इगतपुरी |

**अटी व शर्ती.**

१) श्रीम.जोपळे, आरोग्य सेविका (महिला) हया अनु.जमाती प्रवर्गातील असुन हया नाशिक जिल्हयातील अनु.जमाती क्षेत्रातील स्थानिक रहिवासी असल्याने त्यांनी आदीवासी क्षेत्रात कायमस्वरुपी काम करण्यास संमती दिल्याने त्यांना केवळ स्थानिक आदिवासी क्षेत्रातच नियुक्ती देण्यात येत असुन त्यांची अनुसुचीत क्षेत्राबाहेरील क्षेत्रात कधीही बदली होणार नाही .

२) श्रीम.जोपळे, आरोग्य सेविका (महिला) यांना अनुज्ञेय असलेल्या वेतन श्रेणीत समकक्ष पदावर समान वेतनश्रेणीत आरोग्य सेवक (गट क) या पदावर सध्या घेत असलेल्या मुळ वेतनावर एकतर्फी आंतरजिल्हा बदलीने नाशिक जिल्हा परिषद अंतर्गत सामावुन घेण्यात येत आहे.

३) श्रीम.जोपळे, आरोग्य सेविका (महिला) यांना नाशिक जिल्हा परिषद अंतर्गत त्यांना पदस्थापना दिलेल्या कार्यालयात ज्या तारखेस रुजु होतील त्या दिनांकापासुनची त्यांची आरोग्य सेवक (गट क) या संवर्गात सेवाजेष्ठता धरणेत येईल.

४) श्रीम.जोपळे, आरोग्य सेविका (महिला) यांची नियुक्ती पुर्णत: हंगामी स्वरुपाची राहील. कोणतेही कारण नमुद न करता ते जिल्हा परिषद सेवेतुन मुक्त करण्यांस पात्र राहील.

५) श्रीम.जोपळे, आरोग्य सेविका (महिला) यांची जळगांव जिल्हा परिषदेकडील कोणत्याही प्रकारच्या थकबाकीच्या वसुलीस नाशिक जिल्हा परिषद जबाबदार राहणार नाही.

६) श्रीम.जोपळे, आरोग्य सेविका (महिला) हया जिल्हा परिषद जळगांव कडुन कार्यमुक्त झालेनंतर त्यांना नाशिक जिल्हा परिषदमध्ये ॰॰जर होण्यासाठी कोणत्याही प्रकारचा वाटचाल कालावधी अथवा बदली प्रवास भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

७) श्रीम.जोपळे, आरोग्य सेविका (महिला) हया नाशिक जिल्हा परिषदे अंतर्गत हजर झालेवर त्यांना सदर जिल्हा परिषदेचे सर्व नियम व अटी लागु राहतील .

८) नेमणुकीनंतर विहित असलेली किंवा केल्या जाणाऱ्या शासकीय परिक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण होणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

९) सेवा शर्ती नियमानुसार श्रीम.जोपळे, आरोग्य सेविका (महिला) यांचे सेवा कालावधीत त्यांना केवळ एकदाच आंतर जिल्हा बदलीचा लाभ अनुज्ञेय आहे.

१०) श्रीम.जोपळे, आरोग्य सेविका (महिला) हया सदरचा आदेश मिळालेपासुन एक महिन्याच्या आत त्यांच्या पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न झाल्यास सदरचे आदेश रद्द करण्यात येतील.

सदर आदेशाची नोंद संबंधीताचे मुळ सेवापुस्तकात घेण्यात येवुन योग्य ती कार्यवाही तात्काळ करणेत यावी.

(स्वाक्षरी) १८/११
(दीपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

रजिष्टर पोष्टाने पोहोच पावतीसह

प्रति, १) म.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद.जळगांव यांना उचित कार्यवाहीसाठी.

२) म.जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद,जळगांव.

३) श्रीम.सुनिता नानाजी जोपळे, आरोग्य सेविका (महिला) प्राथमिक आरोग्य केंद्र.गुढे, उपकेंद्र.जुवाडी.ता.भडगांव, जि.जळगांव. व्दारा, म.जिल्हा आरोग्य अधिकारी जिल्हा परिषद,जळगांव यांचे मार्फत

प्रत:- १) म.मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद,जळगांव / नाशिक.

२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती भडगांव जि.जळगांव / इगतपुरी जि.नाशिक.

३) वैद्यकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र खेड ता. इगतपुरी जि. जळगांव/नाशिक.

४) माहिती व प्रसिध्द कक्ष साप्रवि जिल्हा परिषद नाशिक यांना जिल्हा परिषद संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

५) ज्ञापन नस्ती.

(स्वाक्षरी) १८/११
(दीपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**